भारत सरकार

विधि व न्याय मंत्रालय

सत्यमेव जयते

# जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७

(सन १९७७ चा अधिनियम क्रमांक ३६)

[१ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान]

# The Water (Prevention and Control of Pollution) Cess Act, 1977

## (Act No. 36 of 1977)

[*As in force on the 1st March 1989*]

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
१९९१

[किंमत : रु. १.८०]

# प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान असलेला दि वॉटर (प्रिव्हेन्शन अँण्ड कन्ट्रोल ऑफ पोल्युशन) सेस अॅक्ट, १९७७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १, अंक १, दिनांक ९ जुलै, १९९० यात पृष्ठ ५ ते ९ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क्) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक ९ जुलै, १९९०.

**व्ही. एस. रमादेवी,**
सचिव, भारत सरकार.

---

# PREFACE

This edition of The Water (Prevention and Control of Pollution) Cess Act, 1977 as on the 1st March 1989 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in the *Gazette of India*, Extraordinary, Part XII, section 1, No. 1, Vol. 1, dated 9th July 1990 on pages 5 to 9.

This authoritative text was published under the authority of the President under section 2, clause (*a*) of The Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the athoritative text of that Act in Marathi.

**V. S. RAMADEVI,**
Secretary to the Government of India.

New Delhi, 9th July 1990.

# जल (प्रदूषण प्रतिबंध नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७

## कलमांचा क्रम


कलमे

प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती व प्रारंभ.
२. व्याख्या.
३. उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.
४. मीटर बसवणे.
५. विवरणे सादर करणे.
६. उपकराचे निर्धारण.
७. वटाव.
८. उपकराचे उत्पन्न भारताच्या एकत्रित निधीमध्ये जमा करणे आणि त्याचा विनियोग.
९. प्रवेशाची शक्ती.
१०. उपकर भरण्यास होणाऱ्या विलंबाबद्दल व्याज देय असणे.
११. उपकर विनिर्दिष्ट कालावधीमध्ये न भरल्याबद्दल दंड.
१२. या अधिनियमाखालील देय रकमेची वसुली.
१३. अपिले.
१४. शास्ती.
१५. कंपन्यांनी केलेले अपराध.
१६. पहिली अनुसूची विशोधित करण्याची शक्ती.
१७. नियम करण्याची शक्ती.

अनुसूची पहिली.
अनुसूची दुसरी.



एच ४७९४–२ (१,५८४—७-९१)

# जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७

**(सन १९७७ चा अधिनियम क्रमांक ३६)**

(दिनांक १ मार्च १९८९ रोजी यथाविद्यमान)

[७ डिसेंबर १९७७]

**जल-प्रदूषणास प्रतिबंध व त्याचे नियंत्रण करण्यासाठी स्थापन केलेल्या केंद्रीय मंडळाची आणि राज्य मंडळाची साधनसंपत्ती वाढविण्याच्या दृष्टीने विवक्षित उद्योग चालवणाऱ्या व्यक्ती आणि स्थानिक प्राधिकरणे वापरत असलेल्या पाण्यावर 'जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४' अन्वये उपकर बसवून त्याची उगराणी करण्याचा उपबंध करण्यासाठी अधिनियम.**

भारतीय गणराज्याच्या अठ्ठाविसाव्या वर्षी याद्वारे संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो :—

१. (१) या अधिनियमास 'जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) उपकर अधिनियम, १९७७' असे म्हणता येईल. संक्षिप्त नाव, विस्तार, प्रयुक्ती व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) पोट-कलम (२) च्या उपबंधाच्या अधीनतेने, ज्या ज्या राज्यांना 'जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४' (१९७४ चा ६) लागू आहे, त्या सर्व राज्यांना आणि संघराज्यक्षेत्रांना हा अधिनियम लागू होतो.

(४) केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो अंमलात येईल.

२. या अधिनियमात, संदर्भामुळे अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "स्थानिक प्राधिकरण" याचा अर्थ, महानगरपालिका अथवा नगरपरिषद (मग ती कोणत्याही नावाने संबोधली जावो) अथवा छावणी मंडळ अथवा ज्या कायद्याद्वारे किंवा ज्या कायद्यानुसार एखाद्या निकायाची स्थापना झाली आहे, त्या कायद्यान्वये पाणीपुरवठा करण्याचे काम ज्याच्याकडे सोपविले गेले आहे असा, अन्य कोणताही निकाय असा आहे;

(ख) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले असा आहे;

(ग) "विनिर्दिष्ट उद्योग" याचा अर्थ, अनुसूची एक मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही उद्योग असा आहे;

(घ) या अधिनियमात वापरलेले, परंतु व्याख्या न केलेले, मात्र 'जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४' (१९७४ चा ६) यामध्ये व्याख्या केलेले शब्द आणि शब्दप्रयोग यांना प्रत्येकी त्या अधिनियमात नेमून दिल्याप्रमाणे ते ते अर्थ राहतील.

३. (१) 'जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) अधिनियम, १९७४' (१९७४ चा ६) याच्या प्रयोजनार्थ आणि त्याखाली उपयोगात आणण्याकरिता एक उपकर बसवला जाईल व त्याची उगराणी केली जाईल. उपकर बसवणे व त्याची उगराणी करणे.

(२) पोट-कलम (१) खालील उपकर,—

(क) कोणताही विनिर्दिष्ट उद्योग चालविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडून; आणि

(ख) प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाकडून

देय असेल आणि त्याची परिगणना, अशा व्यक्तीने अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाने दुसऱ्या अनुसूचीचा स्तंभ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनार्थ, किती पाणी वापरले, त्या आधारे, केंद्र शासन याबाबत वेळोवेळी शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे पण उपर्युक्त अनुसूचीच्या स्तंभ (२) मधील तद्नुरूप नोंदीत विनिर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा अधिक असणार नाही, अशा दराने केली जाईल.

(३) जेव्हा कोणतेही स्थानिक प्राधिकरण कोणताही विनिर्दिष्ट उद्योग चालविणाऱ्या व्यक्तीला अथवा अन्य कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला पाणीपुरवठा करीत असेल आणि अशी व्यक्ती अथवा असे स्थानिक प्राधिकरण अशाप्रकारे पुरवठा केलेल्या पाण्याबद्दल पोट-कलम (२) अन्वये उपकर भरण्यास दायी असेल तेव्हा, त्या पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, प्रथम उल्लेखिलेले स्थानिक प्राधिकरण अशा पाण्याबद्दल असा उपकर भरण्यास दायी असणार नाही.

**स्पष्टीकरण.**—हे कलम आणि कलम (४) यांच्या प्रयोजनार्थ "पाण्याचा वापर" या शब्दप्रयोगात पाणीपुरवठा याचाही समावेश होतो.

४. (१) कोणताही विनिर्दिष्ट उद्योग चालविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला आणि प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाला पाणी किती प्रमाणात वापरले, ते त्याची मोजणी करून नोंदण्याकरता विहित करण्यात येईल त्याप्रमाणे तशा मानकांचे मीटर, विहित करण्यात येतील अशा जागी बसवावे लागतील आणि मीटर बसवणे.

अशा व्यक्तीने अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाने, मीटरवरून दिसून येणाऱ्या प्रमाणात पाणी वापरले आहे, असे त्याविरुद्ध शाबीत होईपर्यंत, गृहीत धरले जाईल.

(२) जर एखादी व्यक्ती अथवा स्थानिक प्राधिकरण पोट-कलम (१) द्वारे आवश्यक ठरविल्यानुसार मीटर बसवण्यात कसूर करील तर, केंद्र शासन अशा व्यक्तीला अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाला, नोटीस देऊन असे मीटर बसवण्याची व्यवस्था करील आणि केंद्र शासनाला त्या मीटरची किंमत व त्याचबरोबर ते बसवण्यास आलेला खर्च यांची रक्कम, अशा व्यक्तीकडून अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे, त्याच पद्धतीने, वसूल करता येईल.

विवरणे सादर करणे.

५. कोणताही विनिर्दिष्ट उद्योग चालविणारी जी जी व्यक्ती आणि जे जे स्थानिक प्राधिकरण कलम ३ अन्वये उपकर भरण्यास दायी असेल ती प्रत्येक व्यक्ती व ते प्रत्येक प्राधिकरण, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे तशी विवरणे, तशा नमुन्यात, तशा कालांतराने व तशा तपशीलासह तशा अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे सादर करील.

उपकराचे निर्धारण.

६. (१) ज्या अधिकाऱ्याकडे अथवा ज्या प्राधिकरणाकडे कलम ५ अन्वये विवरण सादर करण्यात आले असेल, त्याने स्वतःला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर किंवा करवल्यानंतर आणि विवरणात नमूद केलेला तपशील बरोबर आहे, याबद्दल त्याची खात्री पटल्यानंतर तो अधिकारी किंवा ते प्राधिकरण, एखादा विनिर्दिष्ट उद्योग चालवणाऱ्या संबंधित व्यक्तीकडून अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाकडून किती उपकर देय आहे ते आदेशाद्वारे निर्धारित करील.

(२) पोट-कलम (१) खालील उपकर निर्धारणाच्या आदेशात, कोणत्या तारखेच्या आत राज्य शासनाला उपकर भरण्यात आला पाहिजे ते विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) खालील निर्धारण आदेशाची एकेक प्रत संबंधित व्यक्तीला अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाला आणि राज्य शासनास पाठविली जाईल.

(४) राज्य शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे त्याबाबतीत त्याच्याकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अधिकाऱ्यांच्या अथवा प्राधिकाऱ्यांच्या मार्फत असा उपकर भरण्यास दायी असलेल्या व्यक्तींकडून अथवा स्थानिक प्राधिकरणाकडून उपकराची उगराणी करील आणि अशाप्रकारे उगराणी केलेली रक्कम, विहित करण्यात येईल अशा पद्धतीने आणि अशा कालावधीच्या आत केंद्र शासनाकडे जमा करील.

वटाव.

७. या अधिनियमाखालील उपकर भरण्यास दायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने अथवा स्थानिक प्राधिकरणाने जर गटारी सांडपाणी किंवा कारखान्यातील निःसृते यांवर प्रक्रिया करण्याकरिता एखादे संयंत्र बसवले असेल तर, अशी व्यक्ती अथवा स्थानिक प्राधिकरणे विहित करण्यात येईल अशा दिनांकापासून अशा व्यक्तीने किंवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणाने भरावयाच्या उपकराच्या सत्तर टक्के वटाव मिळण्यास हक्कदार होईल.

उपकराचे उत्पन्न भारताच्या एकत्रित निधीमध्ये जमा करणे आणि त्याचा विनियोग.

८. कलम ३ अन्वये उगराणी करण्यात आलेले उपकराचे उत्पन्न, प्रथम भारताच्या एकत्रित निधीमध्ये जमा केले जाईल आणि संसदेने याबाबत कायद्याद्वारे विनियोजन करून तशी तरतूद केल्यास, केंद्र शासन उगराणीसाठी आलेला खर्च अशा उत्पन्नातून वळता करून, स्वतःला योग्य वाटतील अशा रकमा केंद्रीय मंडळास आणि प्रत्येक राज्य मंडळास, 'जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४' (१९७४ चा ६) अन्वये विनियोग करण्यासाठी वेळोवेळी देऊ शकेल :

परंतु, या कलमाखाली कोणत्याही राज्य मंडळास द्यावयाची रक्कम ठरवताना, कलम ६ च्या पोट-कलम (४) अन्वये त्या राज्य शासनाने उपकराच्या किती रकमेची उगराणी केली ते केंद्र शासन लक्षात घेईल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, "राज्य मंडळ" या शब्दप्रयोगात 'जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४' (१९७४ चा ६) याच्या कलम १३ अन्वये एखादे "संयुक्त मंडळ" घटित केले असेल, तर त्याचाही समावेश आहे.

प्रवेशाची शक्ती.

९. जर राज्य शासनाचा कोणताही अधिकारी अथवा प्राधिकारी यास त्या राज्य शासनाने याबाबत विशेष शक्ती दिली असेल तर, त्याला,—

(क) कलम ४ अन्वये बसवलेल्या मीटरची त्याच्या अचूकतेसाठी चाचणी घेण्यासह या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्याकरिता जेथे प्रवेश करणे त्यास आवश्यक वाटत असेल अशा कोणत्याही जागी, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही सहाय्यानिशी, कोणत्याही वाजवी वेळी, प्रवेश करता येईल;

(ख) या अधिनियमाखालील आपली कर्तव्ये योग्यप्रकारे पार पाडण्याकरिता आवश्यक असेल अशी कोणतीही गोष्ट अशा जागेमध्ये करता येईल; आणि

(ग) विहित करण्यात येतील अशा इतर कोणत्याही शक्ती वापरता येतील.

१०. एखादा विनिर्दिष्ट उद्योग चालविणारी कोणतीही व्यक्ती अथवा स्थानिक प्राधिकरण कलम ३ अन्वये भरावयाचा उपकर, कलम ६ खालील निर्धारण आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकाच्या आत, राज्य शासनाकडे भरण्यात कसूर करील तर, अशी व्यक्ती अथवा, प्रकरणपरत्वे, असे स्थानिक प्राधिकरण, भरावयाच्या रकमेवर असा भरणा जेव्हा देय झाला असेल त्या दिनांकापासून प्रत्यक्ष भरणा केल्याच्या दिनांकापर्यंत, द. सा. द. शे. १२ दराने व्याज भरण्यास दायी राहील. उपकर भरण्यास होणाऱ्या विलंबाबद्दल व्याज देय असणे.

११. कोणताही विनिर्दिष्ट उद्योग चालवणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून कलम ३ अन्वये देय असलेली उपकराची कोणतीही रक्कम, कलम ६ खाली दिलेल्या निर्धारण आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत राज्य शासनाकडे भरली गेली नाही तर, ती रक्कम थकबाकी म्हणून समजली जाईल आणि याबाबत विहित केलेला प्राधिकारी, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा व्यक्तीवर अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणावर, उपकराच्या थकबाकीपेक्षा जास्त नसेल एवढा दंड बसवू शकेल : उपकर विनिर्दिष्ट कालावधीमध्ये न भरल्याबद्दल दंड.

परंतु, असा कोणताही दंड लादण्यापूर्वी, अशा व्यक्तीस अथवा, प्रकरणपरत्वे, स्थानिक प्राधिकरणास, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल आणि अशाप्रकारे त्यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर जर, झालेली कसूर ही एखाद्या सबळ व पुरेशा कारणामुळे झालेली आहे याबद्दल त्या उक्त प्राधिकाऱ्याची खात्री पटली तर, या कलमान्वये कोणताही दंड बसवला जाणार नाही.

१२. कोणताही विनिर्दिष्ट उद्योग चालविणाऱ्या कोणत्याही व्यक्तीकडून अथवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाकडून या अधिनियमान्वये येणे असलेली कोणतीही रक्कम (या अधिनियमाच्या कलम १० किंवा, प्रकरणपरत्वे, कलम ११ अन्वये देय असलेले कोणतेही व्याज किंवा दंडाची रक्कम धरून) केंद्र शासन जमीन-महसुलाच्या थकबाकीप्रमाणे तशाच पद्धतीने वसूल करून घेऊ शकते. या अधिनियमाखालील देय रकमेची वसुली.

१३. (१) कलम ६ अन्वये दिलेल्या निर्धारण-आदेशामुळे अथवा कलम ११ अन्वये दंड लादणाऱ्या आदेशामुळे, व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला अथवा स्थानिक प्राधिकरणाला विहित करण्यात येईल, अशा मुदतीच्या आत, विहित अशा प्राधिकरणाकडे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व विहित करण्यात येईल अशा पद्धतीने, अपील करता येईल. अपिले.

(२) पोट-कलम (१) अन्वये सादर केलेल्या प्रत्येक अपिलासोबत विहित करण्यात येईल अशी फी असेल.

(३) पोट-कलम (१) खालील अपील मिळाल्यावर, अपीलकर्त्याला त्या प्रकरणी स्वतःचे म्हणणे मांडण्याची संधी दिल्यानंतर, शक्य तितक्या त्वरेने अपील प्राधिकारी, ते अपील निकालात काढील.

(४) या कलमाखालील अपीलांती देण्यात आलेला प्रत्येक आदेश हा अंतिम असेल आणि त्यास कोणत्याही न्यायालयात आव्हान देता येणार नाही.

१४. (१) या अधिनियमान्वये विवरण सादर करण्याचे आबंधन ज्यांच्यावर आहे असा जो कोणी एखादे विवरण ते खोटे असल्याचे माहीत असताना अथवा तसे समजण्यास त्यास कारण असताना सादर करील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची, अथवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, अथवा या दोन्ही शिक्षा दिल्या जाऊ शकतील. शास्ती.

(२) या अधिनियमाखाली उपकर भरण्यास दायी असणारा जो कोणी असा उपकर भरण्याचे बुद्धिपुरस्सर किंवा हेतुपूर्वक टाळील अथवा टाळण्याचा प्रयत्न करील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची अथवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची अथवा या दोन्ही शिक्षा दिल्या जाऊ शकतील.

(३) केंद्र शासनाने अथवा त्याच्या प्राधिकारान्वये तक्रार केल्याखेरीज, कोणतेही न्यायालय, या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

१५. (१) या अधिनियमाखालील अपराध जेव्हा एखाद्या कंपनीने केला असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळेत त्या कंपनीच्या कामकाज चालनाबद्दल जी जी व्यक्ती कंपनीची प्रभारी होती किंवा तिला जबाबदार होती अशी प्रत्येक व्यक्ती व तसेच खुद्द कंपनीही त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानले जाईल आणि त्यांच्याविरुद्ध कार्यवाही होण्यास व त्याप्रमाणे शिक्षा दिली जाण्यास ते पात्र राहतील : कंपन्यांनी केलेले अपराध.

परंतु, जर अशा कोणत्याही व्यक्तीने अपराध आपल्या नकळत घडला अथवा हा अपराध घडू नये म्हणून आपण सर्वतोपरी यथोचित तत्परता दाखवली होती असे शाबीत केले तर, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे अशी व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र होणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही समाविष्ट असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केलेला असेल आणि हा अपराध त्या कंपनीचा व्यवस्थापक, सचिव अथवा इतर अधिकारी याच्या संमतीने किंवा मूकानुमतीने घडलेला आहे किंवा त्याने केलेल्या हयगयीशी त्याचा कारणसंबंध

जोडता येण्यासारखा आहे, असे शाबीत करण्यात आले असेल तेव्हा, असा व्यवस्थापक, सचिव अथवा इतर अधिकारी अशा अपराधाबद्दल दोषी आहे असे समजले जाईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही होण्यास व त्याप्रमाणे शिक्षा मिळण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण** :—या कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(क) "कंपनी" याचा अर्थ, कोणताही निगम-निकाय असा आहे आणि त्यात, एखादी पेढी अथवा अन्य व्यक्तिसंघ यांचाही समावेश होतो; आणि

(ख) "संचालक" याचा पेढीच्या संबंधातील अर्थ, त्या पेढीमधील भागीदार असा आहे.

पहिली अनुसूची विशोधित करण्याची शक्ती.

१६. (१) कोणताही उद्योग चालवण्यासाठी करावा लागणारा पाण्याचा वापर आणि तत्परिणामी होणाऱ्या निचऱ्यामुळे होणारे एखाद्या प्रवाहाचे प्रदूषण लक्षात घेऊन, केंद्र शासन, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, पहिल्या अनुसूचीमध्ये अशा उद्योगाची भर घालू शकेल आणि तदनंतर, पोट-कलम (२) च्या उपबंधांच्या अधीनतेने, पहिली अनुसूची त्याप्रमाणे विशोधित झाली असल्याचे मानण्यात येईल.

(२) अशी प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेचे सत्र चालू असेल तर तेव्हा, आणि जर संसदेचे सत्र चालू नसेल तर, तिचे सत्र पुन्हा भरल्यापासून सात दिवसांच्या आत, संसदेच्या प्रत्येक सभागृहासमोर मांडली जाईल आणि अधिसूचना ज्या दिवशी लोकसभेपुढे मांडली जाईल त्या दिवसापासून पंधरा दिवसांच्या अवधीत ठराव मांडून अधिसूचनेला संसदेची मान्यता मिळवण्याचा केंद्र शासन प्रयत्न करील आणि जर संसदेने त्या अधिसूचनेत काही फेरफार केला अथवा ती निष्परिणामक व्हावी असा निदेश दिला तर, तदनंतर ती अधिसूचना अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल अथवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही—मात्र त्यामुळे त्या अधिसूचनेअन्वये तत्पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

नियम करण्याची शक्ती.

१७. (१) या अधिनियमाची प्रयोजने साध्य करण्यासाठी केंद्र शासनाला वेळोवेळी नियम करता येतील.

(२) पूर्वगामी शक्तीच्या व्यापकतेला बाध न येता, अशा नियमामध्ये पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही बाबीसंबंधी तरतूद करता येईल, त्या बाबी अशा :—

(क) कलम (४) च्या पोट-कलम (१) खाली कोणत्या मानकाचे मीटर आणि ते कोणत्या ठिकाणी बसवण्यात यावेत;

(ख) कलम ५ खाली कोणती विवरणे सादर करावीत, ती कोणत्या नमुन्यात आणि किती कालांतरागणिक सादर करावीत. अशा विवरणांमध्ये कोणता तपशील असावा व अशी विवरणे कोणत्या अधिकाऱ्याकडे किंवा प्राधिकरणाकडे सादर करावीत;

(ग) उगराणी करण्यात येणारा उपकर कलम ६-पोट-कलम (४) खाली कोणत्या पद्धतीने आणि किती मुदतीच्या आत केंद्र शासनाकडे जमा करण्यात यावा;

(घ) उपकर भरण्यास दायी असलेली कोणतीही व्यक्ती किंवा स्थानिक प्राधिकरण कलम ७ खाली कोणत्या दिनांकापासून वटाव मिळण्यास हक्कदार होईल;

(ङ) कलम (९) खाली, अधिकाऱ्याला अथवा प्राधिकरणाला कोणत्या शक्ती वापरता येतील;

(च) कलम ११ खाली कोणते प्राधिकरण दंड बसवू शकेल;

(छ) कलम १३ चे पोट-कलम (१) याखाली कोणत्या प्राधिकरणाकडे अपील सादर करण्यात यावे आणि असे अपील कोणत्या नमुन्यात आणि कोणत्या पद्धतीने आणि किती मुदतीच्या आत दाखल करावे;

(ज) कलम (१३) च्या पोट-कलम (२) खाली अपिलासोबत किती फी भरावी लागेल; आणि

(झ) विहित करावयाची किंवा करता येईल अशी अन्य कोणतीही बाब.

(३) या अधिनियमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे ते सत्रासीन असताना एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या तीस दिवसांच्या कालावधीकरता मांडला जाईल आणि ज्या सत्रात तो याप्रमाणे ठेवला ते किंवा त्याच्या पाठोपाठचे सत्र अथवा सत्रे संपण्यापूर्वी जर त्या नियमात कोणताही फेरफार करण्याविषयी दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले अथवा तो नियम करू नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, तो नियम तदनंतर अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल अथवा, प्रकरणपरत्वे, मुळीच परिणामक होणार नाही—तथापि, अशा फेरफारामुळे किंवा शून्यीकरणामुळे, त्या नियमाखाली तत्पूर्वी केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

## अनुसूची पहिली

[ कलम २(ग) पहा ]

(१) लोहीय धातुउद्योग.
(२) अलोहीय धातुउद्योग.
(३) खाण उद्योग.
(४) अशोधित धातूवर प्रक्रिया करण्याचा उद्योग.
(५) पेट्रोलियम (खनिज तेल) उद्योग.
(६) पेट्रोकेमिकल (पाषाण रासायनिक) उद्योग.
(७) रासायनिक उद्योग.
(८) सेरॅमिक (मृत्तिकाशिल्प) उद्योग.
(९) सिमेंट उद्योग.
(१०) वस्त्रनिर्माण उद्योग.
(११) कागद उद्योग.
(१२) रासायनिक खत उद्योग.
(१३) कोळसा (कोक धरून) उद्योग.
(१४) (औष्णिक व डिझेली) शक्ति-निर्मिति उद्योग.
(१५) प्राणिज अथवा वनस्पतिज पदार्थांवर प्रक्रिया करण्याचा उद्योग.

---

## अनुसूची दुसरी

[कलम ३ पहा]

| पाण्याचा वापर कोणत्या प्रयोजनासाठी केला (१) | कमाल दर (२) |
|---|---|
| १. उद्योगांमधील शीतन प्रक्रियेसाठी, खाण-खळग्यांमध्यें फवारणीसाठी किंवा बॉयलरला इंधन पुरवठा करण्यासाठी. | प्रत्येक किलोलिटरमागे एक पैशाचा तीन-चतुर्थांश. |
| २. घरगुती प्रयोजनासाठी . . . . | प्रत्येक किलोलिटरमागे एक पैसा. |
| ३. ज्यायोगे पाणी प्रदूषित होते अशाप्रकारची प्रक्रिया करण्यासाठी—<br>प्रदूषक घटक हे सहजगत्या जीवाणुद्वारा विघटनीय असतात तेव्हा. | प्रत्येक किलोलिटरमागे दोन पैसे. |
| ४. ज्यायोगे पाणी प्रदूषित होते अशा प्रकारची प्रक्रिया करण्यासाठी—<br>प्रदूषक घटक हे सहजगत्या जीवाणुद्वारा विघटनीय नसतात तर ते विषारी असतात तेव्हा. | प्रत्येक किलोलिटरमागे अडीच पैसे. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.